# **नोटीस**

दिनांक-25 /11/2025

राष्ट्रीय सेवा योजनेमधील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की **26 नोव्हेंबर 'भारतीय संविधान दिनानिमित्त' भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन व प्रबोधन पर व्याख्याना**चे आयोजन केले जाणार आहे तरी आपण सर्वांनी दिनांक 26 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 9.30 वाजता जी 14 मध्ये उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

# अहवाल

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये संविधान दिवसानिमित्त शपथ व प्रबोधन कार्यक्रम

बुधवार दिनांक- 26 नोव्हेंबर, 2025 रोजी म. फुले शिक्षण संस्थेच्या, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये भारतीय संविधान दिवसानिमित्त शपथ व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. एनएसएस विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून सक्षम नागरिकत्वाची जपणूक करावी, असे आवाहन केले. मुख्य वक्ते म्हणून डॉ. संतोष खडसे यांनी उपस्थितांना संविधानाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू समजावून सांगितले. भारताच्या राज्यघटनेचे वेगळेपण, तिची समावेशकता, लोकशाही मूल्यांची पायाभरणी आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची महत्ता त्यांनी प्रभावीपणे मांडली.

प्रा.डॉ.अंगद पाटील यांनी संविधान प्रस्ताविचेच्या वाचनाचे महत्व सांगताना ‘सरनामा’ हा संविधानाचा आत्मा असल्याचे सांगितले. कार्यक्रमादरम्यान सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना प्रा,दिपाली चव्हाण-पाटील यांनी संविधान प्रास्ताविकेची शपथ दिली. कार्यक्रमाचे आभार ज्युनिअरच्या कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका ज्योती कथलकर यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. अश्विनी थोरात यांनी केले.

यावेळी संस्थेच्या सदस्या प्रा.स्मिता पाटील, कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, प्रा.सुजाता चोपडे, प्रा.वंदना पाटील, प्रा.हरीश वसावे, प्रा. मनीषा शेळके तसेच एनएसएस स्वयंसेवक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. एकूणच कार्यक्रमाच्या माध्यमातून संविधानाबद्दल जागरूकता, संवेदनशीलता आणि नागरिक म्हणून कर्तव्यांची जाणीव दृढ करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे झाला. या कार्यक्रमाचे संयोजन एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश आठवले आणि सहकारी यांनी केले.




भारतीय संविधानाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ संतोष खडसे




भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे महत्व विशद करताना प्रा.डॉ. अंगद पाटील




अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे




भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची शपथ देताना प्रा.दिपाली चव्हाण-पाटील व उपस्थित मान्यवर




भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची शपथ घेताना उपस्थित मान्यवर

**सकाळ TODAY**

# ईश्वरपूरमध्ये संविधान दिनानिमित्त प्रबोधन

सकाळ वृत्तसेवा



**ईश्वरपूर** : संविधान प्रस्ताविकेची शपथ अनुग्रहित करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, प्रा. स्मिता पाटील, डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील, डॉ. प्रकाश आठवले, डॉ. संतोष खडसे, प्रा. ज्योती कथलकर, प्रा. डी. जे. पाटील.

ईश्वरपूर, ता. २६ : कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये भारतीय संविधान दिवसानिमित्त शपथ व प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम एनएसएस, राज्यशास्त्र विभाग यांच्यातर्फे पार पडला.

प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून सक्षम नागरिकत्व जपण्याचे आवाहन केले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. संतोष खडसे यांनी संविधानाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू, समावेशकता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची महत्ता स्पष्ट केली.

सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी संविधान प्रस्ताविकेची शपथ घेतली. प्रा. ज्योती कथलकर यांनी आभार मानले. संस्थेच्या सदस्य प्रा. स्मिता पाटील, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, ज्युनियर उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील आणि एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश आठवले उपस्थित होते.



**पुढारी**

## संक्षिप्त



ईश्वरपूर : संविधान प्रास्ताविकेची शपथ अनुग्रहित करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, प्रा. स्मिता पाटील, डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील, डॉ. प्रकाश आठवले, डॉ. संतोष खडसे, प्रा. ज्योती कथलकर.

### कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये संविधान दिन शपथ व प्रबोधन कार्यक्रम

**ईश्वरपूर :** महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये भारतीय संविधान दिवसानिमित्त शपथ व प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. एनएसएस विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्यांचा अंगीकार करून सक्षम नागरिकत्वाची जपणूक करावी, असे आवाहन केले. प्रास्ताविक करताना राज्यशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. संतोष खडसे यांनी उपस्थितांना संविधानाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू समजावून सांगितले. ज्युनिअरच्या एन. एस. एस.च्या कार्यक्रमाधिकारी प्रा. ज्योती कथलकर यांनी आभार मानले. याप्रसंगी संस्थेच्या सदस्या प्रा. स्मिता पाटील, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, ज्युनियरचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, एन. एस. एस.चे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश आठवले उपस्थित होते.